नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०२/१२/२०२५ (मंगळवार )**

## नागपुर ग्रामीण जिल्यातील नगर परिषद/नगर पंचायत निवडणुक २०२५ यशस्वीरित्या पार पडल्याबाबत..

आज दिनांक ०२/१२/२०२५ रोजी नागपूर ग्रामीण जिल्हयातील सावनेर, कळमेश्वर, मोहपा, खापा, काटोल, नरखेड, कन्हान पिपरी, उमरेड, रामटेक, बोरी अशा एकुण ११ नगर परिषद तसेच मोवाड, कोंढाळी, कांद्री, मौदा, भिवापूर, पारशिवनी अशा एकुण ०५ नगरपंचायत अंतर्गत मतदान प्रक्रीया संपन्न झाली आहे. **एकुण २०१ इमारतीमधील ४०४ मतदान केंद्रावर कडेकोट बंदोबस्त नेमण्यात आला होता.**

नमुद निवडणुकीच्या अनुषंगाने मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांनी वेळोवेळी जिल्यातील संवेदनशिल मतदान केंद्रे तसेच स्ट्रॉग रूम बंदोबस्त, एस.एस.टी पथके, एफ. एस. टी. पथके यांना भेटी देवुन त्यांना महत्त्वाच्या सुचना दिल्या होत्या. तसेच निवडणुकी संदर्भात प्रशासकिय अधिकारी यांची बैठक सुध्दा घेण्यात आली होती. **निवडणुकीसाठी नागपुर ग्रामीण पोलीसांनी अभिलेखावरील गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई, रूट मार्च, दंगा काबु योजना, अवैध पैसे आणि दारू वाटपाला आळा घालण्यसाठी सुरू केलेली ड्रोन पेट्रोलींग, तसेच सायरन पेट्रोलींग, पायदळ पेट्रोलींग आणि विशेष मोहीम राबवुन हॉटेल्स, लॉज, धाबे आणि फार्म हाऊस, गेस्ट हाउस ची तपासणी तसेच आंतरराज्यीय सिमेवरती नाकाबंदी या सर्व प्रतिबंधात्मक उपाययोजनांची सांगड घालुन दिनांक ०२/१२/२०२५ रोजी चा निवडणुक बंदोबस्त पार पाडण्यात आला. तसेच सर्व मतपेटया संबधीत १६ स्ट्रॉग रूम मध्ये दाखल करण्यात आल्या असुन स्ट्रॉग रूम करीता त्रिस्तरीय सुरक्षा बंदोबस्त नेमण्यात आला आहे.**

नगर परिषद /नगर पंचायत सार्वत्रिक निवडणुक २०२५ बंदोबस्ताकरीता नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व उपविभागिय पोलीस अधिकारी यांच्या सह १८ पोलीस निरीक्षक, ९६ सपोनि/पोउपनि, ११७४ पोलीस अंमलदार, ७०० गृहरक्षक ,तसेच राज्य राखीव दल — ०२ कंपनी, दंगा नियंत्रण पथक — ०२ पथक, जलद प्रतिसाद पथक (क्यु आर टी) —०२ पथक आणि अधिक ०६ पथके यांनी काटेकोर पणे त्यांना नेमुन दिलेले कर्तव्य पार पाडुन नगर परिषद /नगर पंचायत सार्वत्रिक निवडणुक २०२५ चा बंदोबस्त यशस्वीरित्या पार पाडला. बंदोबस्तातील प्रत्यक्ष /अप्रत्यक्ष रित्या सहभागी असलेल्या सर्व अधिकारी/ अंमलदाराचे मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी हार्दीक अभिनंदन केले आहे.

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद

## मौदा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन मौदा** :— दिनांक ०१/१२/२०२५ रोजी मौदा पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेती ची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी नागपुर ते भंडारा रोड शाहु धाबा समोर नाकाबंदी केली असता एका पांढ—या रंगाचा कॅबिन व निळया रंगाचा डाला असलेला १२ चक्का ट्रक क्र एम एच ४० सी.टी. २४१७ मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. **वाहन चालक/मालक नामे धनराज दादारामजी हलमारे, वय ३० वर्ष, रा. बासोरा, जि. भंडारा** याला रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. पोलीसांनी पंचासमक्ष **१) १२ चक्का ट्रक क्र एम एच ४० सी. टी.२४१७ किंमती ४०,००,०००/— रूपये आणि २) १० ब्रास रेती किंमती ५०,०००/— रूपये असा एकुण ४०,५०,०००/रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

नमुद आरोपी वाहन चालक याच्या विरूध्द पोस्टे मौदा येथे कलम ३०३(२) भा.न्या. सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण

खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



# अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे तसेच दारू बाळगुण विक्री,वाहतुक तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १६ गुन्हे नोंद. १ लाख २७ हजार ८६० रूपयांचा मुद्देमाल जप्त

दिनांक ०१/१२/२०२५ दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू काढणारे तसेच दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू, सडवा, दुचाकी वाहन तसेच इतर साहीत्य असा **एकुण १२७८६०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

पोलीस स्टेशन जलालखेडा येथे एकुण २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन नरखेड येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन कोंढाळी येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन काटोल येथे ३ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन कन्हान येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन कुही येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे ५ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन केळवद येथे १ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे १ गुन्हा नोंद आहे . महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम अन्वये एकुण १६ नोंद केले आहे.

**सदर कारवाईत ५६२५० मिली देशी दारू, १५३ लीटर मोहाफुल दारू, १४०० लिटर सडवा, दुचाकी वाहन तसेच इतर साहीत्य असा एकुण १,२७,८६०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नाशवंत मुद्देमाल पंचानामा कारवाई करून नष्ट करण्यात आला आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने